


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे अंक : ७०९. वा गुरुवार दि. १४ मार्च २०२४ पृष्ठ ८ किंमत ३रुपये

# विकासाच्या बाबतीत बुलढाणा जिल्हा कधी येणार पुढे?

## सर्वसमान्य नागरिकांचे प्रश्न,समस्या दिल्लीपर्यंत पोहोचत नसल्याची खंत

## भाजपा कडून चांडक ठरू शकता गेम चेंजर...



भाग-4

**जनसंचलन /बुलढाणा**

महाराष्ट्रात मागास विदर्भ आणि विदर्भातही गडचिरोलीनंतर मागास समजल्या जातो तो बुलढाणा जिल्हा. जिल्ह्यात आज अनेक प्रश्न आ वासून उभे आहेत. वर्षानुवर्षे जिल्ह्याचे प्रश्न तसेच कायम आहे. त्याला सर्वांत महत्वाचे कारण म्हणजे दिल्ली दरबारी जिल्हावासीयांचा आवाज न पोहोचणे हेच आहे. गेल्या १५ वर्षांत प्रतापराव जाधव यांनी जिल्ह्याचे लोकसभेत प्रतिनिधित्व केले. मात्र, जिल्ह्याचे प्रश्न हे लोकसभेत म्हणजेच शासन दरबारी प्रभावीपणे मांडण्यास प्रतापराव जाधव कधीही सक्षमपणे दिसून आले नाहीत. या स्थितीमुळेच बुलढाणा जिल्हा हा विकासाच्या बाबतीत पुढे येणार तरी कधी,असा प्रश्न आता जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक विचारू लागले आहेत. बुलढाणा जिल्हा हा ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक व भौगोलिकदृष्ट्या अत्यंत महत्वाचा जिल्हा आहे. जगप्रसिद्ध लोणार सरोवर, छत्रपती शिवाजी महाराजांद्वारे स्थापित स्वराज्याच्या प्रेरणा राजमाता माँ जिजाऊंचे जन्मस्थान सिंदखेडराजा, ही दोन महत्वाची ठिकाणे जिल्ह्यात आहेत. शिवाय मेहकरचा शारंगधर बालाजी, देऊळगावराजाचा प्रति तिरुपती बालाजी, शेगावचे श्री संत गजानन महाराज संस्थान सैलानी बाबांची दर्गा ही महत्वपूर्ण देवस्थाने जिल्ह्यात आहेत. एकीकडे हा अत्युच्च वारसा असताना दुसरीकडे विकासाच्या बाबतीत जिल्हा फारच मागे पडलेला आहे. एक खामगावची औद्योगिक नगरी वगळता जिल्ह्यात मोठे उद्योगधंदे नाहीत, दळणवळणाची मुबलक साधने नाहीत. मलकापूर ते शेगावपर्यंत एकच रेलवे लाईन जिल्ह्यात आले. खामगाव-जालना रेलवे मार्गाचा प्रश्न तर आता प्राचीन असल्याचे भासू लागले आहे. जिल्ह्यात सिंचनाचा गंभीर प्रश्न आहे. शेतीप्रशासनाने शेतकऱ्यांना प्रचंड अडचणीत आलेले आहे. उद्योगधंद्यांअभावी रोजगारासाठी नागरिकांचे मोठ्या प्रमाणात पलायन होते आहे. एक-दोन मुख्य मार्ग सोडल्यास जिल्ह्यात दळणवळणासाठी अंतर्गत चांगले रस्ते नाहीत. या सर्व समस्या सोडवायच्या असतील, तर लोकसभेत विकासाची दूरदृष्टी असलेला, धडाडीचा व कर्तृत्ववान बुलंद आवाज असणे गरजेचे आहे. प्रतापराव जाधव या आघाडीवर पूर्णपणे अपयशी ठरले आहेत, हे सांगण्यासाठी आता कोण्या तज्ज्ञाची गरज राहिलेली नाही. तीन-तीन वेळा खासदार करून सुद्धा बुलढाणा जिल्हावासीयांच्या पदरी निराशेचे धोंडेच पडलेले आहेत. प्रतापरावांविषयी एकीकडे सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजी तर आहेच, परंतु दुसरीकडे त्यांना सातत्याने निवडून आणण्यात भारतीय जनता पक्षाचा देखील मोठा वाटा आहे. प्रतापराव जेंव्हा निवडून यायचे तेंव्हा शिवसेना एकसंध होती. परंतु आता शिवसेनेत पडलेली फूट, भाजपचे वाढलेले वजन, भाजप कार्यकर्त्यांची प्रतापरावांबद्दल नाराजी आणि कधीतरी आपल्या पक्षाचा खासदार जिल्ह्यात निवडून यावा, या भावनेपोटी सध्यातरी प्रतापरावांच्या उमेदवारीचे देऊळ पाण्यातच दिसून येत आहे. **या स्थितीत भाजपकडून एखादे विकास करू शकणारे असे बुलंद नेतृत्व बुलडाणा अर्बन परीवार सर्वेसर्वा राधेश्याम चांडक यांच्या सारखा लोकसभा २०२४ उमेदवार जिल्ह्यातील बेरोजगारी,उद्योगांच्या माध्यमातून विकास उभे करून देशाचे पंत प्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न साकार होतील जिल्ह्यातील सुज्ञ नागरिकांमध्ये भाजपकडून बुलढाणा जिल्हा करिता चांडक यांचे नाव प्रथम क्रमांकावर निदर्शनात दिसून येत आहे तर ते भाजपलाही हवे आहे. सामान्य जनतेला पक्ष-संघटना याविषयी काही घेणे-देणे नसते. जनतेची अपेक्षा ही विकासाची असते. जनतेचे छोटे-छोटे प्रश्न सुटणे गरजेचे आहे. शेतीसाठी काही सवलती, रोजगार, रस्ते-पाणी यासारख्या पायाभूत सुविधा या जनतेला देणारा हाच खरा लोकप्रतिनिधी असतो. गेल्या काही दिवसांपासून भाजपकडून उमेदवारीसाठी ज्या राधेश्याम चांडक उर्फ भाईजी यांचे नाव पुढे येत आहे, ते भाजपसाठी गेमचेंजर ठरू शकते.** भाजप सध्या प्रत्येक मतदारसंघात उमेदवाराची जिंकण्याची शक्यता, पात्रता हेच निकष ठेवत आहे. त्या निकषात कमीत कमी प्रतापराव जाधव कुठेही बसत नाहीत, हे स्पष्ट आहे. त्यामुळेच यंदा मतदारसंघात बदल व्हावा व जिल्हावासीयांचा एक बुलंद आवाज लोकसभेत पोहोचावा, अशी जिल्हावासीयांची रास्त अपेक्षा असेल तर काहीच चुकीचे नाही.

## ट्रक व कार अपघातात मेहकर येथील अ‍ॅड. विजय बाजड ठार....

**जनसंचलन/मेहकर**

हिवरा आश्रम गॅस सिलेंडरची वाहतूक करणारा ट्रक व क्रिएटा कार यांची समोरासमोर धडक लागून झालेल्या अपघातात मेहकर येथील प्रसिध्द विधीज्ञ ॲड. विजय हिंमतराव बाजड (वय ४०) हे ठार झाले. सदर अपघात मेहकर चिखली रस्त्यावरील लव्हाळापासून जवळच असलेल्या माळखेड फाटा येथे बुधवारी दुपारी १२:३० च्या सुमारास घडला. ॲड. बाजड यांची नुकतीच भाजपाच्या विधी सेलच्या राज्य उपाध्यक्षपदी नियुक्ती झाली होती. ॲड. विजय बाजड हे मेहकर, बुलढाणा तसेच नागपूरच्या उच्च न्यायालयात वकील व्यवसाय करीत होते. बुधवारी सकाळी बुलढाणा येथून ते एकटेच एम.एच.-२८ बी. के. या क्रिएटा या चार चाकी गाडीने मेहकर कडे येत असतात माळखेड फाट्याजवळ बुलढाणाकडे गॅस सिलेंडरचे वाहतूक करणाऱ्या ट्रक क्र. एम.एच. ३७-टी १८२० ची समोरासमोर जोरदार धडक बसली. या अपघातात ॲड. बाजड यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांना तावडतोब चिखली येथे खासगी दवाखान्यात उपचारार्थ दाखल करण्यात आले. मात्र त्या ठिकाणी त्यांची प्राणज्योत मालवली. सदर अपघात एवढा भीषण होता की गाडीचा समोरील भाग चकनाचुर झाला आहे.

# जिल्ह्यातील नागरिकांनी आयुष्मान कार्ड काढावे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुभाष चव्हाण यांचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा जोतीराव फुले जनआरोग्य योजना राज्यात राबविण्यात येत आहे. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत लाभार्थी प्रति कुटुंबांना प्रत्येक वर्षी ५ लाख रूपयांपर्यंत ठराविक आजारावर मोफत उपचाराचा लाभ घेता येतो. या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुभाष चव्हान यांनी केले आहे.

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत १ हजार २०९ प्रकारच्या वैद्यकीय उपचारपद्धती आणि शस्त्रक्रिया अंगीकृत रुग्णालयात मोफत केली जाते. जिल्ह्यामध्ये आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत २५ रुग्णालय अंगीकृत आहेत. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांकडे आयुष्मान ई-कार्ड असणे आवश्यक आहे. जिल्ह्यामध्ये आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचे एकूण १८ लाख ५ हजार ५५० लाभार्थी आहेत. त्यापैकी आतापर्यंत ६ लाख ८९ हजार ३८८ असे ३८ टक्के लाभार्थ्यांनी आयुष्मान कार्ड काढले आहेत.

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे लाभार्थी आयुष्मान कार्ड ग्रामपंचायत अंतर्गत केंद्रचालक, खासगी आपले सरकार सेवा केंद्र, आशा सेविका, अंगीकृत रुग्णालयातील आरोग्यमित्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, राशन दुकानदार आणि स्वतः मोबाईलवर केवायसी करून काढू शकतात. लाभार्थ्यांनी स्वतः आयुष्मान कार्ड काढण्यासाठी लाभार्थ्यांनी अँड्रॉईड मोबाईल मध्ये प्लेस्टोरमध्ये जाऊन आयुष्मान ॲप डाउनलोड करावे. त्यामध्ये लाभार्थी लॉगिनमधून स्वतः चा मोबाईल क्रमांक टाकून लॉगिन




करावे. त्यानंतर स्वतःचा आधारकार्ड क्रमांक टाकून आपण लाभार्थी आहोत किंवा नाही ते शोधावे. लाभार्थी असल्यास स्वतःचा आधार कार्ड क्रमांक आणि मोबाईलवर येणार ओटीपी टाकून स्वतः आयुष्मान कार्ड काढण्यासाठी केवायसी करू शकतात. त्यानंतर केवायसी अँप्रुव्हल आल्यानंतर स्वतः आयुष्मानकार्ड मोबाईलमध्ये डाउनलोड करता येते.

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेसंबंधी अडचणी असल्यास लाभार्थ्यांनी योजनेच्या जिल्हा रुग्णालयातील कक्ष क्र. ८ येथील जिल्हा कार्यालयाशी किंवा टोल फ्री नंबर १५५३८८, १८००२३३२२००, १४५५५, १८००१११५६५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## खामगांव शहरातील ऑटो युनीयन चा स्तुत्य उपक्रम...

**जनसंचलन /खामगाव**

दि.१२ मार्च रोजी उपविभागीय अधिकारी खामगांव तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी ५-बुलढाणा लोकसभा मतदारसंघ, खामगांव यांचे अध्यक्षतेखाली व तहसीलदार अतुल पाटोळे, खामगांव, नायब तहसीलदार नितीन पाठक, तथा पथक क्रमांक ११ वाहन व्यवस्थापन नोडल अधिकारी, तसेच स्टेनो अनिल खिराडे,यांचे उपस्थितीत महात्मा गांधी सभागृह तहसील कार्यालय, खामगांव येथे बैठक पार पडली.

यावेळी टॅक्सी युनियन चे अध्यक्ष निलेश देवताळू व संजय अवताडे उपस्थितीत होते लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता ०५-बुलढाणा लोकसभा मतदारसंघामधील खामगांव विधानसभा मतदारसंघाकरिता मतदान केंद्रावर ८५ वर्ष व त्यापेक्षा अधिक वरील तसेच दिव्यांग मतदार, गरोदर व स्तनदा माता, यांना ऑटोद्वारे मतदानाकरिता ने-आण करण्याकरिता सदर बैठक घेण्यात आली होती. सर्व प्रथम उपविभागीय अधिकारी यांनी निवडणूकीबाबत व मतदान करणेबाबत महत्व काय आहे तसेच यावर्षी जास्तीत जास्त मतदान झाले पाहिजे कोणीही मतदान करण्यापासून वंचित राहणार नाही व सर्वांना आपला मतदानाचा हक्क बजावता आला पाहिजे याबाबत आपले मताचे काय महत्व आहे.याबाबत सांगितले. सभेमध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता ०५-बुलढाणा लोकसभा मतदार संघामधील खामगांव विधानसभा मतदारसंघाकरिता मतदान केंद्रावर ८५ वर्षावरील, दिव्यांग मतदार, गरोदर व स्तनदा माता, यांना ऑटो द्वारे मतदानाकरिता पैसे न घेता मोफत सेवा म्हणून ने-आण करण्याकरिता तहसिलदार खामगांव यांनी निलेश देवताळू व संजय अवताळे यांना विनंती केली व त्यांना खामगांव विधानसभा मतदारसंघामधील एकूण २८ लोकेशनबाबतची यादी देण्यात आली. ज्या ठिकाणी जास्त मतदान केंद्र आहेत त्या ठिकाणी किमान दोन ऑटोची व्यवस्था व ज्या ठिकाणी फक्त एकच केंद्र आहे त्या त्या ठिकाणी एक ऑटोची व्यवस्था करण्याबाबत विनंती केली. त्यानुसार सदर विनंती मान्य करुन त्यांना दिलेल्या लोकेशनच्या यादीप्रमाणे ऑटोची व्यवस्था मोफत मध्ये ऑटो सेवा देणेबाबत मान्य केले बैठकीच्या शेवटी नायब तहसिलदार तथा नोडल अधिकारी यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

## निवडणुकीतील खर्चावर राहणार आयोगाचे लक्ष लोकसभेसाठी ९५ लाख रूपयांची मर्यादा

**जनसंचलन /बुलडाणा**

येती लोकसभा सार्वत्रिक निवडणूक पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडाव्यात यासाठी निवडणूक आयोगाकडून मार्गदर्शक सूचना आणि आदेश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर बुलडाणा जिल्ह्यात उमेदवार, राजकीय पक्ष यांचाकडून होणाऱ्या निवडणूक खर्चावर संनियंत्रण, परिक्षण करण्याची तयारी करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील दिली.

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रति उमेदवार ९५ लाख रुपये कमाल खर्चाची मर्यादा निश्चित केली आहे. निवडणुकीदरम्यान सदर खर्च मर्यादेचे पालन होण्यासाठी उमेदवारांना उमेदवारी अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून विहित नमुन्यात दैनंदिन निवडणूक खर्चाशी संबंधित समन्वय अधिकारी यांच्याकडे सादर करावा लागणार आहे, निवडणूक कार्यक्रमादरम्यान



गैरप्रकार रोखण्यासाठी विधानसभा मतदार संघनिहाय प्रत्येकी स्थायी निगरानी पथक, भरारी पथक, चलचित्र निगराणी पथके, तैनात करण्यात आली आहे. सदर पथके राजकीय सभा, रॅली यासारख्या प्रत्येक कार्यक्रमावर सूक्ष्म नजर ठेवणार आहे. तसेच प्रत्येक बाबीचे चित्रीकरण करण्यात येणार आहे. सदर पथकातील कर्मचाऱ्यांचे आदेश निर्गमित करण्यात आले आहे. तसेच त्यांचे प्रशिक्षणही घेण्यात आले आहे.

सर्व विधानसभा मतदारसंघनिहाय दैनदिन खर्चाकरिता नेमलेल्या समन्वय अधिकारी यांच्याकडून आढावा घेण्यात येणार आहेत. तसेच निवडणूक खर्चाबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींची पडताळणी करण्यात येणार आहे.

## नागरिकांनी उष्णतेच्या लाटेपासून संरक्षण करावे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

हवामान खात्याच्या अंदाजानुसार उन्हाळ्यात उष्णतेच्या लाटे प्रभावी राहणार आहे. कोणत्याही प्रकारची जीवितहानी होऊ नये, यासाठी उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

उष्णतेची लाट आणि उष्माघातापासून बचावासाठी तहान लागलेली नसली तरी अधिक पाणी प्यावे, हलकी, पातळ आणि सच्छिद्र सुती कपड्यांचा वापर करावा, बाहेर जाताना गॉगल्स, छत्री, टोपी, बुट आणि चपलाचा वापर करावा, प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत घ्यावी, उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करावा. तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकण्यात यावा. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस, घरी बनविण्यात आलेली लस्सी, तोरणी, निंबूपाणी, ताक आदींचे नियमित सेवन करावे. अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम आदी उन्हाचा झटका बसण्याची लक्षणे ओळखावी. चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. गुरांना छावणीत ठेवण्यात यावे. तसेच त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी द्यावे. घरे थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर आणि सनशेडचा वापर करावा. रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात. पंखे, ओले कपड्याचा वापर करावा. तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करावे. कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. सूर्य प्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सूचना देण्यात यावी. पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा. बाहेर कामकाज करीत असताना मध्ये नियमीत आराम करावा. गरोदर महिला कामगार व आजारी कामगारांची अधिक काळजी घेण्यात यावी. रस्त्याच्या कडेला उन्हापासून संरक्षणाकरीता शेड उभारावेत. उन्हात अतिकष्टाची कामे टाळावीत,



दारू, चहा आणि कार्बोनेटेड थंड पेय घेऊ नये. उच्च प्रथिनेयुक्त पदार्थ खाण्याचे टाळावे. उष्ण कालावधीत लहान मुले व पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नये. तीव्र उन्हात मुख्यत: दुपारी १२ ते ३ या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे, गडद, घट्ट आणि जाड कपडे घालण्याचे टाळावे, बाहेरील तापमान अधिक असल्यास शारीरीक श्रमाची कामे टाळावीत. दुपारी १२ ते ३ या कालावधीत बाहेर काम करणे टाळावे. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळण्यात यावे. तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक दारे व खिडक्या उघडी ठेवावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांनी केले आहे

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# शुभम देसाई यांची भाजपा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीसपदी नियुक्ती...

## शुभम देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक युवकांनी भाजपामध्ये केला प्रवेश

जनसंचलन/ लोणार

मेहकर भाजपा महामेळावा निमित्त चिखली मतदारसंघाच्या आमदार श्वेताताई महाले, माजी आमदार विजय राज शिंदे साहेब लोकसभा प्रमुख, गणेश दादा मांटे साहेब जिल्हाध्यक्ष, मोहनजी शर्मा लोकसभा समन्वय, संतोष बापू देशमुख जिल्हाध्यक्ष किसान मोर्चा, विनायकजी भाग्यवंत जिल्हाध्यक्ष युवा मोर्चा, योगेशजी सावंत जिल्हा सचिव भाजपा, मा. आ. तोतारामजी कायंदे, सुंदरजी खरात ओबीसी जिल्हा अध्यक्ष, प्रकाश गवई मेहकर विधानसभा प्रमुख, जिल्हा संयोजक उद्धव आटोळे,भगवानजी सानप तालुका अध्यक्ष लोणार, सारंग माळेकर तालुका अध्यक्ष मेहकर, शुभम बनमेरू भाजपा शहराध्यक्ष लोणार, गजानन घुले जिल्हा महामंत्री भाजपा, ॲड.शिवाजी सानप जिल्हा उपाध्यक्ष भाजपा, तसेच जिल्ह्यातील सर्व आघाड्या सेल्स १०० वॉरियर्स व महिला आघाडी युवा मोर्चा शिक्षक कर्मचारी संघटना सर्व मोर्चे यांची सर्व पदाधिकारी कार्यकर्ते महामेळाव्याला उपस्थित होते या. महामेळाव्या दरम्यान देसाई शुभम देसाई लोणार यांनी श्वेता ताई महाले यांच्या नेतृत्वामध्ये व गणेश दादा मांटे जिल्हा अध्यक्ष भाजप यांच्या मार्गदर्शनाखाली विनायक जी भाग्यवंत जिल्हाध्यक्ष भाजप युवा मोर्चा बुलढाणा यांनी शुभम देसाई यांची जिल्हा सरचिटणीस भाजपा युवा मोर्चा बुलढाणा या पदी यावेळी नियुक्ती केली या नियुक्ती दरम्यान शुभम देसाई यांच्या मार्गदर्शनामध्ये अनेक युवकांनी प्रवेश घेतला येथील तडफदार कर्तव्यदक्ष आमदार श्वेता ताई महाले यांच्या हस्ते भाजप युवा मोर्चा शेकडोच्या संख्येमध्ये लोणार तालुका लोणार शहर येथील युवकांनी प्रवेश केला...या दरम्यान लोणार मधून खालील पदाधिकारी उपस्थित होते.श्रीकांत इंगळे, तालुका उपाध्यक्ष भाजपा युवा मोर्चा सचिन फोलने, मच्छी उत्पादन सेल तालुका अध्यक्ष मुकेश मादनकर या प्रसंगी उपस्थित होते.



# किनगाव जट्टू येथील स्मशानभूमीचा होत आहे कायापालट

जनसंचलन /लोणार



लोणार तालुक्यातील किनगाव जट्टू येथील, देवीच्या मंदिरात जवळील, खापरखेड रस्त्यावर असलेल्या स्मशानभूमीची, फारच बिकट अवस्था झालेली आहे, त्यामुळे येथील स्वच्छता समितीचे अध्यक्ष राजेश नागरे, व सामाजिक कार्यात सतत अग्रेसर असणारे, ग्रामसेवक विनोद सातपते, यांनी सदर स्मशानभूमीचे नंदनवर करण्याचा ध्यास घेतला आहे, यामुळे गजानन महाराजांच्या प्रकट दिनाच्या दिवशी, त्यांनी प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली असून, स्मशानभूमी मध्ये असलेली झाडे झुडपे, काटेरी झाडे, व इतर अनावश्यक बाबी काढून टाकून, स्वच्छता करण्यास ध्यास घेतला आहे. भविष्यात या स्मशानभूमीमध्ये, नागरिकांना असणाऱ्या आवश्यक सुविधा उपलब्ध करून, स्मशानभूमीचे नंदनवन करणार आहे, यामध्ये बसण्याची व्यवस्था, स्वच्छता, वेगवेगळ्या प्रकारची वृक्ष लागवड करून, मानवी जीवनाचा अंत, व त्यावर होणारे अंत्यसंस्कार आनंददायी वातावरणात व्हावे यासाठी प्रयत्न करणार आहेत, हे सर्व करण्यासाठी लोकसभागाचा वापर करून, नंदनवन करणार आहेत यासाठी राजेश नागरे, व विनोद सातपते हे सातत्याने प्रयत्न करत आहेत.

# आजपासून दोन दिवसीय ग्रंथोत्सवास सुरूवात

जनसंचलन /बुलडाणा

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातर्फे दि. १४ आणि १५ मार्च रोजी दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गर्दे वाचनालयाच्या सभागृहातील या ग्रंथोत्सवात वाचन संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार होण्यासाठी ग्रंथप्रदर्शन, ग्रंथविक्री, कविसंमेलन, व्याख्याने, तसेच विविध विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरूवार, दि. १४ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता हुतात्मा स्मारकापासून गर्दे वाचनालयापर्यंत ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. यावेळी आमदार संजय गायकवाड यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे उद्घाटन होणार आहे. यावेळी गोकुळ शर्मा, प्रा. डॉ. एस. एम. कानडजे, शिक्षणाधिकारी अनिल आकाळ, जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटूरवार उपस्थित राहतील. त्यानंतर सकाळी १०.३० वाजता पालकमंत्री दिलीप वळसे पाटील, खासदार प्रतापराव जाधव, रक्षा खडसे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलिस अधिक्षक सुनील कडासने, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, छत्रपती संभाजीनगरचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे उपस्थित राहणार आहेत. पंजाबराव गायकवाड उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन करतील. दुपारी स्पर्धा परीक्षेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी दि. १५ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता वाचन संस्कृतीमध्ये समाजमाध्यमांची भूमिका विषयावर व्हाईस ऑफ मिडीयाचे अध्यक्ष अनिल म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रकांत बर्दे, राजेंद्र काळे, लक्ष्मीकांत बगाडे, अरुण जैन, नितीन शिरसाट, सुभाष लहाने, निलेश जोशी, अजय बिलारी, वसिम शेख, गजानन धांडे, रणजितसिंग राजपूत, रफिक कुरेशी सहभागी होतील. दुपारी १२.३० वाजता सार्वजनिक ग्रंथालयांचे सामाजिक योगदान या विषयावर प्रा. कि. वा. वाघ, नेमीनाथ सातपुते, सुनिल वायाळ, डॉ. राजेंद्र गणगे, सुनील झोरे, अनंत सातव, निशिकांत ढवळे, महेंद्र बोर्डे उपस्थित राहतील. जिल्ह्यातील ग्रंथालय कर्मचारी आणि पदाधिकारी यांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी राजेश पाटील यांनी केले आहे.

# महिला बचतगट विक्री केंद्राचे लोकार्पण...

जनसंचलन/बुलढाणा

महिला आर्थिक विकास महामंडळ आणि महिला व बाल विकास विभागातर्फे बचत गटातील महिलांना उत्पादित मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी विक्री केंद्र उभारण्यात आले आहे. या विक्री केंद्राचा लोकार्पण सोहळा सोमवार, दि. ११ मार्च रोजी जिजामाता प्रेक्षागार येथे पार पडला. यावेळी खासदार प्रतापराव जाधव, आमदार संजय गायकवाड, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल दिघोळे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजेश ईंगळे, जिल्हा अभियान व्यवस्थापक विक्रांत जाधव, नागरी जीवन्नोनती अभियानाचे व्यवस्थापक महेंद्र सोभागे आदी उपस्थित होते. खासदार श्री. जाधव यांनी महिला बचतगटांनी उत्पादित मालाच्या विक्रीसाठी नऊ तालुक्यात केंद्र सुरु करण्यात आले आहे. यातून महिलांनी उद्योजक बनावे असे आवाहन केले. बचतगटातील महिला प्रामुख्याने ग्रामीण क्षेत्रातील असल्याने त्यांना पॅकींग, ब्रँडींगबाबत सुविधा मिळाव्यात. यासाठी जिल्ह्यातील औद्योगिक परिसरामध्ये बचत गटासाठी सामुदायिक सुविधा केंद्र उभारणीस अल्प दारात जागा उपलब्ध करून दिली आहे. त्यासोबत ब स्थानकामध्ये महिला बचतगटाकरीता विक्री केंद्र उभारण्यात येणार असल्याचे सांगितले. आमदार श्री. गायकवाड यांनी बच गटातील महिलांसाठी १०० दुकाने उपलब्ध करून देणार आहे. तसेच बुलडाणा शहरामध्ये बचत भवनाची उभारणी करण्यात



येणार आहे. महिलांनी शासनाच्या विविध योजनाचा लाभ घ्यावा, प्रधानमंत्री यांनी घोषित केलेले लखपती दीदी अभियान यशस्वी करावे, त्याकरीता उद्योग आणि बँक अर्थ सहाय्याकरीता सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासित दिले. जिल्हा समन्वय अधिकारी सुमेध तायडे यांनी प्रास्ताविक केले. सहजिल्हा समन्वय अधिकारी समीर देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. वर्षा गवई यांनी आभार मानले.

# मंत्री चंद्रकांत पाटील यांचा जिल्हा दौरा...

जनसंचलन /बुलढाणा

उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील गुरूवार, दि. १४ मार्च रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. श्री. पाटील यांच्या दौरा कार्यक्रमानुसार, गुरुवार, दि. १४ मार्च २०२४ सकाळी ५ वाजता शेगाव रेल्वे स्थानक येथे आगमन व वाहनाने शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण करतील. सकाळी ७ वाजता शासकीय विश्रामगृह येथून श्री गजानन महाराज देवस्थान, शेगावकडे प्रयाण करतील. त्यानंतर सकाळी ७.१५ वाजता श्री गजानन महाराज देवस्थान, शेगाव येथे आगमन होईल.



सकाळी ८ वाजता श्री गजानन महाराज देवस्थान, शेगाव येथून वाहनाने अकोला कडे प्रयाण करतील.

# बुलढाणा लोकसभेच्या रिंगणात नंदू लवंगे...



जनसंचलन/बुलढाणा

या वर्षीची लोकसभा निवडणूक हि आगळीवेगळी होण्याच्या मार्गाने दिसत आहे. कारण या निवडणूकीमध्ये लोकसभा लढविण्यासाठी अनेक नवीन चेहरे उतरलेले आहे. या मध्ये धनगर समाजाचे युवा नेते नंदू लवंगे यांनी लोकसभा लढविण्याचे ठरविले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बुलडाणा जिल्ह्यात दांडगा जनसंपर्क असलेले नंदुभाऊ लवंगे प्रत्येक व्यक्तीच्या सुख दु:खात धावुन जातात. प्रत्येक वेळी मदत करतात. मागच्या दहा वर्षापासुन अनेक वेळी त्यांनी धनगर समाजाच्या विविध समस्यांवर तोडगा काढण्यासाठी संघर्ष केला आहे. धनगर समजासह इतर बहुजन समाजासाठी सुद्धा लढत असतात. अश्यातच गेल्या अनेक वर्षापासुन प्रलंबीत असलेला धनगर समाज आरक्षण प्रश्न, मेंढपाळ बांधवांसाठी पासेस, चारवु कुरणांचा प्रश्न , तसेच मेंढपाळ बांधवांवर वेळोवेळी होणारे हल्ले, वनविभाग आणि मेंढपाळ बांधव यांच्यातील संघर्ष, अश्या सर्व ठिकाणी स्वतः धावत जावून अनेकांना न्याय मिळवून दिला आहे. बहुजन समाजातील युवकांच्या पाठींबा असलेले नंदु लवंगे यांना आपण येणारी लोकसभेची निवडणूक लढवावी असा बुलडाणा जिल्ह्यातील बहुजन समाज बांधवांचा आग्रह यामुळे लवकरच धडाडीचे नेते नंदु लवंगे निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे.

# विधवांनो मुलांच्या भवितव्यासाठी विवाहाचा निर्णय घ्या- अश्विनी सोनोने

जनसंचलन/बुलढाणा

विधवा महिलांना छोटी-मोठी मुले असतात विवाह केला तर या मुलांचे काय होईल ? हा विचार त्यांना सारखा सतावत असतो. त्यामुळे अनेक विधवा महिला लग्नासाठी पुढे येत नाही.मात्र विधवा महिलांनी लग्न केल्यास मुलांना पित्याचे छत्र मिळेल व जीवनात स्थैर्य देखील निर्माण होईल. यासाठी पुढे येण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्त्यां तथा मानस फाउंडेशन च्य सदस्या अस्विनी सोनोने यांनी केले आहे.

ऐतिहासिक विधवा विवाह सोहळा १८ मार्च रोजी मातृ मंडळ मंगल कार्यालय शिवशंकर नगर बुलडाणा या ठिकाणी पार पडत आहे.प्रा.डी एस लहाने यांच्या संकल्पनेतील हा सोहळा सर्वांचे आकर्षण व समाज बदलाची नांदी ठरतोय. या विवाह सोहळ्याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. अनेक विधवा महिलांनी नोंदणी सुद्धा केली आहे. समाजमन तयार करणे हा विधवा विवाहातील मोठा अडथळा आहे. लोक काय म्हणतील या भीतीने अनेक महिला पुढे येण्यासाठी घाबरतात. तसेच विधवा महिलांना जर एखाद दुसर मुल असतील तर या मुलांचे काय होईल ?त्यांना व्यवस्थित सांभाळल जाईल का ?असा विचार त्यांना सारखा सतावत असतो. मात्र जगामध्ये सर्वच काही वाईट नसते. चांगल्या गोष्टीचे प्रमाणही बरेच आहे. त्यामुळे कोणतीही भीती न बाळगता या विधवा विवाह सोहळ्यामध्ये नावे नोंदवून



आवर्जून उपस्थिती लावावी, शिवशाही पतसंस्था बुलडाणा या ठिकाणी प्यांच्या हेल्पलाइन उघडण्यात आली आहे.या ठिकाणी नोंदणी करावी असे आवाहन अश्विनी सोनवणे यांनी केले

# अवैध सागवान प्रकरणात आणखी एकास अटक...

## एक लाख ३६ हजारांचा मुद्देमाल जप्त,आरोपीस एका दिवसाची वनकोठडी

जनसंचलन/बुलढाणा

तालुक्यातील गोतमार शिवारातील अवैध सागवान प्रकरणात वनविभागाच्या पथकाने तिघांना जेरबंद केले होते. याच गुन्ह्यात १२ मार्च रोजी आणखी एका आरोपीला अटक करण्यात आली असून, त्याच्या ताब्यातून १ लाख ३६ हजार ५९७ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या आरोपीला १३ मार्च रोजी मोताळा न्यायालयात हजर केले असता, त्याला एका दिवसाची वनकोठडी मिळाली आहे. गोतमारा शिवरात अवैधरीत्या सागवानची वाहतूक होत असताना, बुलडाणा डीएफओ सरोज गवस यांच्या मार्गदर्शनात बुलडाणा आरएफओ अभिजीत ठाकरे, पाडळी वर्तुळ अधिकारी स्वप्निल वानखेडे यांच्या पथकाने आरोपी सुभाष वसंता चव्हाण (रा. गोतमारा), अनिल प्रल्हाद सपकाळ (रा. हनवतखेड), मनोहर दशरथ तायडे या तिघांना २१ फेब्रुवारी रोजी अटक केली होती. त्यांच्या ताब्यातून १० लाख ६७ हजार ४०० रुपये किमतीचे एकूण १४.४०० घनमीटर सागाची लाकडे जप्त करण्यात आली होती. तिघा आरोपींना २२ फेब्रुवारी रोजी एका दिवसाची वनकोठडी मिळाली होती.



वनविभागाच्या पथकाने त्यांची कसून चौकशी केली असता, या गुन्ह्यात आणखी एक आरोपी निष्पन्न झाला. दरम्यान, वनविभागाच्या पथकाने आरोपी साहेबराव श्रीनाथ इतवारे याला १२ मार्च रोजी बुलडाणा येथून अटक केली. त्याच्या ताब्यातून १ लाख ३६ हजार ५९७ रुपये किमतीची १.५१४ घनमीटर सागाची लाकडे इजलापूर (ता. बुलडाणा) येथून जप्त करण्यात आली. या आरोपीला १३ मार्च रोजी मोताळा न्यायालयाने एका दिवसाची वनकोठडी सुनावली.

वन विभागाच्या पथकाने ताब्यात घेतलेला आरोपी.

चौघांकडून आतापर्यंत १२ लाखांचा मुद्देमाल जप्त या गुन्ह्यात चौघा आरोपींकडून आतापर्यंत एकूण १२ लाख ३ हजार ९९७ रुपये किमतीची अवैध सागवानाची चौरस व गोल लाकडे जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई उपवनसंरक्षक सरोज गवस यांच्या मार्गदर्शनात वनरक्षक पी.पी. मुंढे, बी.ए. घुले, विक्रम राऊत, एम.जी. बोरकर, प्रवीण सोनने, संदीप मडावी यांच्या पथकाने केली. या गुन्ह्यात आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. पुढील तपास वनपाल स्वप्निल वानखेडे हे करीत आहे.

# दारूसाठी पैसे न दिल्याने साळ्याची जावयास मारहाण..

जनसंचलन/ खामगाव

दारूसाठी पैसे न दिल्याने जावयास मारहाण करण्यात आली. ही घटना सजनपुरी येथे सोमवारी रात्री घडली. तक्रारीनुसार, सजनपुरी येथील हनुमान मंदिराजवळील रहिवासी रवी मन्नालाल पिसाळे रात्री ८ वाजताच्या सुमारास घराबाहेर बसलेले होते. त्यावेळी त्यांचा साळा रामू लक्ष्मण सावरकर हा तेथे आला. दारू पिण्यासाठी पैशांची मागणी केली. त्यावेळी पिसाळे यांनी पैसे नसल्याचे



सांगताच चिडून रामूने रवी यांना काठीने मारहाण करून शिवीगाळ केल्याचा आरोप तक्रारीत केला आहे. या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलिसांनी आरोपीविरोधात शिवीगाळ करणे तथा मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार

डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)